महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ६७.
COMMISSIONERATE OF ANIMAL HUSBANDRY
स्पायसर मेमोरिअल कॉलेज समोर, औंध, पुणे ४११ ०६७.
Maharashtra State, Opposite Spicer Memorial College, Aundh, Pune 411067
E-Mail : cah.diseasecontrol@gmail.com
Telephone No.-020-25690480; 81; 85
Extn. 239,240,241,242,243,244

*"पशुधनाच्या आजारावर घरपोच उपचार, एका कॉलच्या अंतरावर ; संपर्क टोल फ्री क्रमांक - १९६२"*

---

जा. क्र. रोनि/लसीकरण /५/ ७४८-८२४ /२०२३, पसं- १२, औंध, पुणे, ६७. दि.१८ /१/२०२४

# -: परिपत्रक :-

**विषय:- "भारत पशुधन-राष्ट्रीय डिजिटल पशुधन अभियान (NDLM)" प्रणालीमध्ये जनावरांच्या जन्म-मृत्यूची नियमित नोंद घेणे,"प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९"मधील संसर्गजन्य आणि सांसर्गिक रोगांचे प्रतिबंध आणि यंत्रण कलम ३९ अन्वये जारी केलेले निर्देशांची अंमलबजावणी व ई- प्रिस्क्रिप्शनचा पूर्ण क्षमतेने वापर करणे बाबत.**

**संदर्भ-** १. अ.शा.पत्र क्र. डीएएचडी-१४०२४/२/२०२३/एच-४(ई-६९१३५२) दि.०८.०१.२०२४
२.एफवायपी २३(२४)/आयटीहब/सीआर-५/ २६६६ /२०२३/पसं-६.दि.१५.१२.२०२३
३. एफवायपी २३(२४)/आयटीहब/सीआर-५ / २६७५ /२०२३/पसं-६, दि.१८.१२.२०२३
४. एफवायपी २३(२४)/आयटीहब/सीआर-५ / २६७७ /२०२३/पसं-६, दि.१८.१२.२०२३

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, "भारत पशुधन-राष्ट्रीय डिजिटल पशुधन अभियान (NDLM)" प्रणालीमध्ये ई- प्रिस्क्रिप्शनचा पूर्ण क्षमतेने वापर करणे, जनावरांच्या जन्म-मृत्यूची नियमित नोंद घेणे व प्राणी कायदा, "प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९" (The Prevention and Control of Infectious & Contagious Diseases in Animals Act, २००९) कलम ३९ अन्वये केंद्र शासनाने जारी केलेले निर्देशानुसार अंमलबजावणी करणे करिता या कार्यालयाद्वारे संदर्भीय पत्रान्वये आपणास सूचीत करण्यात आलेले आहे.

राज्यात National Digital Livestock Mission अंतर्गत Bharat Pashudhan Portal प्रणालीवर राज्यातील पशुधनाची आवश्यक ती माहिती भरण्यासाठी केंद्र शासनाकडून आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात आले असून, सदर प्रणालीवर माहिती भरण्यासाठी आवश्यक असे दृक-श्राव्य चित्रफितीही उपलब्ध आहेत. असे असतांनाही राज्यात Bharat Pashudhan Portal वर फार कमी नोंदी झाल्यामुळे संदर्भीय पत्र १ नुसार मा. सचिव महोदय यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

Bharat Pashudhan Portal वर करण्यात येणाऱ्या नोंदी विशेषतः पशुधनावर दैनंदिन प्रतिबंधात्मक उपचार तसेच आजारादरम्यान देण्यात येणाऱ्या औषधांबाबतच्या नोंदी (e-Prescription) हया अत्यंत महत्वाच्या आहेत. सदर नोंदींच्या आधारे राज्यात अथवा राज्याच्या काही भागात अस्तित्वात असलेल्या आजाराबाबत आगाऊ माहिती मिळून इतर भागात प्रतिबंधात्मक उपाययोजना

करणे सुलभ होते. त्यामुळे पशुधनाची जिवितहानी, पशुधनापासूनच्या उत्पन्नावरील विपरीत परिणाम टाळणे शक्य होते. या पार्श्वभुमीवर पशुधनावर दैनंदिन प्रतिबंधात्मक उपचार तसेच आजारादरम्यान देण्यात येणाऱ्या औषधांबाबतच्या नोंदी (e-Prescription) Bharat Pashudhan Portal वर नियमितरित्या करण्याबाबत केंद्रशासन अतिशय आग्रही असून राज्याची याबाबतची कामगिरी अतिशय निराशाजनक आहे, असे खेदाने नमुद करण्यात येत आहे. तसेच, केंद्र शासनाने जन्म-मृत्यु तसेच, कत्तल करण्यात येणाऱ्या सर्व पशुधनाच्या नोंदी देखिल Bharat Pashudhan Portal वर घेण्याबाबत आदेशित केले आहे.

जन्माला येणाऱ्या व मृत पावणाऱ्या सर्व पशुधनाबाबत संबंधित शेतकरी पशुपालकाने २४ तासाच्या आत ग्रामपातळीवर नेमण्यात आलेल्या व्यक्तीस कळविणे बंधनकारक आहे.ही माहिती ग्राम पातळीवर नेमण्यात आलेल्या व्यक्तीने ०२ दिवसात संबंधित पशुवैद्यकीय अधिकाऱ्यास द्यावयाची असून, संबंधित पशुवैद्यकाने १०५ दिवसात ही माहिती Bharat Pashudhan Portal या प्रणालीवर भरणे बंधनकारक आहे. मृत झालेल्या पशुधनाची माहिती भरल्यानंतर या प्रणालीवर सदर पशुधनाची नोंदणी अकार्यरत होईल.

शासन निर्णय ०४.१२.२०२३ अन्वये दि. ०१.०४.२०२४ पासून कत्तल होणाऱ्या प्रत्येक पशुधनास ईअर टॅग असणे व त्याची नोंद Bharat Pashudhan Portal वर असणे बंधनकारक राहील. त्या अनुषंगाने कत्तलखान्यातील संबंधित पशुवैद्यकाने विना ईअर टॅग पशुधनाची कत्तल करण्यास परवानगी देवू नये आणि पशुधनाची कत्तलपूर्व तपासणी झाल्यानंतर तशी नोंद Bharat Pashudhan Portal वर घेणे बंधनकारक राहील.

या परीपत्रकाद्वारे आपणास निर्देशित करण्यात येते कि, संदर्भ क्र. २ अन्वये निर्गमित सर्व सूचनांचे व केंद्र शासानाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून Bharat Pashudhan Portal प्रणालीवरील पशुधनाच्या सर्व माहिती अद्ययावत करण्याबरोबरच जन्म-मृत्यु नोंदी अद्यावत ठेवणे बाबत खालील निर्देशांचे पालन करावे.

१) जनावरांच्या जन्म आणि मृत्यूचा तपशील तात्काळ प्रभावाने भारत पशुधन ॲप/वेब पोर्टलवर अनिवार्यपणे नोंदणीकृत केला जाईल.
२) जनावरांच्या जन्म आणि मृत्यूची नोंद करण्यासाठी आपल्या स्तरावर गावपातळीवर ग्रामस्तरीय नोडल व्यक्तीची नेमणूक करावी. सदर व्यक्तीच्या कार्यक्षेत्रातील जनावरांच्या जन्म-मृत्यूच्या नोंदी विहित वेळेमध्ये भारत पशुधन प्रणालीवर करण्याची जबाबदारी त्याची असेल.
३) पशुपालकाने त्याच्या मालकीच्या जनावराचा मृत्यू झाल्यास २४ तासांच्या कालावधीमध्ये सदर मृत्यूची माहिती म्हणजेच मृत्यूची तारीख आणि वेळ तसेच जनावराचा बिल्ला क्रमांक ग्रामस्तरीय नोडल व्यक्ती/नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये/अथवा टोल-फ्री क्रमांकावर द्यावी.
४) पशुपालकाकडून उपरोक्त नमूद माहिती प्राप्त झाल्यानंतर संबंधित ग्रामस्तरीय नोडल व्यक्तीने सदर नोंदींचा तपशिल जसे की मृत्यूची तारीख आणि वेळ तसेच मृत्यूचे संभाव्य कारण इ. भारत पशुधन प्रणालीवर नोंदवावा.
५) ग्रामस्तरीय नोडल व्यक्तीने सदर नोंदीं भारत पशुधन प्रणालीवर नोंदविल्यानंतर सदर नोंदी संबंधित पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडे मान्यतेसाठी जातील. पशुवैद्यकीय अधिकाऱ्याने सदर नोंदींची पडताळणी ५ दिवसांमध्ये पूर्ण करणे अपेक्षित आहे.

६) पशुवैद्यकीय अधिकाऱ्याने मान्यता दिल्यानंतर सदर बिल्ला क्रमांक (Tag) कायमस्वरूपी निष्क्रिय होईल आणि अशा बिल्ला (Tag) क्रमांकावर भविष्यात कोणत्याही नोंदी करणे शक्य होणार नाही.

७) सदर कायद्याच्या कलम ४ अंतर्गत तरतुदीमध्ये नमूद असलेले रोग आढळल्यास अशा रोगांचे अहवाल सादर करणे आवश्यक आहे. संबंधित पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी अशा रोगांच्या सर्व नोंदी ठेवाव्यात.

८) जनावरांच्या जन्म-मृत्यूच्या नोंदी करताना प्रथम गायवर्गीय/म्हैसवर्गीय प्रजातीच्या जनावरांच्या जन्म-मृत्यूच्या नोंदी कराव्यात आणि नंतर वेळोवेळी आवश्यकतेनुसार इतर प्रजातींच्या नोंदी घ्याव्यात.

९) संसर्गजन्य रोगांचा प्रतिबंध आणि नियंत्रण,२००९ या कायद्याअंतर्गत नमूद केलेल्या शास्त्रीय पद्धतीनेच मृत जनावरांची विल्हेवाट लावावी.

१०) भारत पशुधन या प्रणालीद्वारे जनावरांचे मृत्यू प्रमाणपत्र देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे आणि सदर प्रमाणपत्राचा नमुना देखिल उपलब्ध करून देण्यात आलेला आहे (प्रत संलग्न). पशुपालकाने मृत्यू प्रमाणपत्राची मागणी केल्यानंतर ७ दिवसांमध्ये संबंधित पशुवैद्यकीय अधिकाऱ्याने प्रणालीवर उपलब्ध करून दिलेल्या पद्धतीचा अवलंब करून मृत्यू प्रमाणपत्र संबंधित पशुपालकास द्यावे.

तसेच संदर्भ क्र. ३ अन्वये निर्गमित सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करून कत्तल करण्यात येणाऱ्या सर्व पशुधनाच्या नोंदी Tagging करून NDLM वर घेण्यासाठी खालील सूचनांचे पालन करावे.

I. १ एप्रिल २०२४ पासून कत्तल/मांस प्रक्रियेच्या उद्देशाने फक्त टॅग आयडी असलेले प्राणी कत्तल/प्रक्रियेसाठी पात्र असतील. सर्व राज्ये आणि अशा सुविधांचे प्रभारी पशुवैद्यकीय अधिकारी हे सुनिश्चित करतील की खाली नमूद केलेले प्रोटोकॉल/प्रक्रिया प्रवाहित होईल.

II. राज्य सरकार कत्तलखाने/मांस प्रक्रिया युनिटसाठी नियुक्त केलेल्या सर्व पशुवैद्यकांना राष्ट्रीय डिजिटल पशुधन अभियान (NDLM) अंतर्गत भारत पशुधन डिजिटल प्लॅटफॉर्म वापरण्याचे निर्देश देईल आणि कत्तल/मांस प्रक्रियेसाठी विचारात घेतलेल्या प्राण्यांच्या तपशिलांचे रेकॉर्डिंग सुनिश्चित करेल.

III. कत्तलखाने/मांस प्रक्रिया युनिटसाठी जनावरांच्या हालचालीदरम्यान टॅग नसलेले कोणतेही प्राणी प्रक्रिया सुविधेपर्यंत पोहोचत नाहीत याची खात्री करण्यासाठी सर्व चेक पोस्ट्स/पशुवैद्यकीय रुग्णालये सर्व प्राण्यांना अशा मालामध्ये टॅग केले आहेत की नाही हे तपासावे.

IV. जर अशा वाहतुकीमध्ये टॅग न केलेले प्राणी असतील तर चेकपोस्टच्या प्रभारी संबंधित राज्य पशुवैद्यकांनी वाहतुकीचे वाहन पुढे जाण्यास परवानगी देण्यापूर्वी प्राण्यांना टॅग करणे आणि त्यांचा डेटा भारत पशुधन ॲपवर अपलोड करणे सुलभ केले जाईल.

V. कत्तलखाना/मांस प्रक्रिया युनिटचे प्रभारी पशुवैद्य हे सुनिश्चित करतील की टॅग आयडी असलेल्या प्राण्यांचा केवळ कत्तलखान्यात कत्तलीसाठी विचार केला जाईल.

VI. तरीही कोणताही टॅग न लावलेला प्राणी कत्तलखान्यात पोहोचल्यास, संबंधित शासकीय पशुवैद्यक प्रभारी अशा प्राण्याला टॅग लावेल किंवा टॅग लावण्याची व्यवस्था करेल.

VII. अशा सर्व पशुवैद्यकांना/कार्यालयांना संबंधित राज्य पशुसंवर्धन विभागाने राष्ट्रीय पशु रोग नियंत्रण कार्यक्रम (NADCP) योजनेंतर्गत उपलब्ध केलेल्या तरतुदीतून टॅग उपलब्ध करून दिले जातील.

VIII. त्यानंतर शवविच्छेदनपूर्व तपासणीचे तपशील या टॅग आयडी विरुद्ध पशुवैद्यक प्रभारी द्वारे प्रणालीमध्ये प्रविष्ट केले जातील आणि शवविच्छेदनापूर्वीच्या प्रक्रियेच्या आरोग्य नियमांच्या अधीन राहून कत्तल/प्रक्रियेसाठी प्राणी तपासणी करतील.

IX. एकदा का शवविच्छेदनापूर्वीचा तपशील प्रणालीमध्ये प्रविष्ट केल्यावर NDLM सॉफ्टवेअरमध्ये केली जाईल.

तसेच संदर्भ क्र. ४ अन्वये निर्गमित केलेल्या सूचनेनुसार **"भारत पशुधन"** या प्रणालीवरील खालीलप्रमाणे निर्देशित करण्यात येत आहे.

a. पशुआरोग्य टॅबमधील समाविष्ट उपचार, शस्त्रक्रिया, लसीकरण, प्रथमोपचार, रोगतपासणी, रोगप्रादुर्भाव अहवाल यासोबतच ई-प्रिस्क्रिप्शनचा पूर्ण क्षमतेने वापर करणे बाबत निर्गमित सूचनांचे व केंद्र शासनाच्या निर्देशाचे कटाक्षाने पालन करावे.

b. पशुधनावर दैनंदिन प्रतिबंधात्मक उपचार तसेच आजारादरम्यान देण्यात येणाऱ्या औषधांबाबतच्या नोंदी (e-Prescription) Bharat Pashudhan Portal वर नियमितपणे घेण्यात याव्यात.

c. रोग निरीक्षण आणि संबंधित नियंत्रण उपायांसाठी अपेक्षित परिणाम प्राप्त करण्यासाठी क्षेत्रीय पशुवैद्यकांनी उपचार/ई- प्रिस्क्रिप्शनचा पूर्ण क्षमतेने वापर करावा.

( डॉ.हेमंत वसेकर, भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन ,
महाराष्ट्र राज्य, औंध,पुणे- ६७.

प्रति,

१. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व)
२. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व)

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाही साठी :
प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व)

प्रत माहितीस्तव सविनय सादर :
मा. सचिव (पदु), महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास,मंत्रालय, मुंबई-३२